# जनसुनावणीचे इतिवृत्त

मे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचे कडून प्रस्तावित बडोदरा मुंबई द्रुगती मार्ग (Phase-II) 26.320 किमी ते 104.7 किमी (390.864 किमी राष्ट्रीय महामार्ग-8) मुख्य द्रुगती मार्ग महाराष्ट्र राज्य विकसीत करण्याच्या अनुषंगाने पर्यावरणविषयक जाहीर सुनावणी दिनांक ११/०२/२०२० रोजी दुपारी १२.३० वाजता दहीसर तर्फ मनोर, ता. व जि. पालघर या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

1) **श्री. दिलीप गुट्टे** – **अध्यक्ष**
अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी /
अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर

**२) श्री. डी.बी. पाटील** – **प्रतिनिधी, सदस्य सचिव मप्रनि, मंडळ**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, ठाणे

**३) श्री. अमर दुर्गुळे** – **आयोजक म.प्र.नि. मंडळ**
उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, तारापुर-२

**जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे -**

म. प्र. नि. मंडळ, तारापुर-२ विभागाचे उप प्रादेशिक अधिकारी, तथा जनसुनावणीचे आयोजक श्री अमर दुर्गूळे यांनी मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी / अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर व जनसुनावणीचे अध्यक्ष व मप्रनि मंडळाचे प्रतिनिधी आणि सार्वजनिक सुनावणीसाठी उपस्थित असलेले सामान्य जनतेचे स्वागत केले. वने व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ अधिसूचना व सुधारित करण्यात आलेल्या नियमास अनुसरून सदर प्रकल्पाची पर्यावरण जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे. मे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी वने व पर्यावरण मंत्रालय, भारत

सरकार यांच्याकडे पर्यावरण अनुमतीसाठी अर्ज दाखल केला असता सदर अर्जाच्या अनुषंगाने काही अटी व शर्तीसह तो पुन्हा सादर करण्याबाबत प्रकल्पदारास कळविले. सदर अटीमध्ये उपरोक्त प्रकल्पाची पर्यावरण विषयक जनसुनावणी घेणेबाबत कळविले. त्यानुसार सदर प्रकल्पधारकाने पर्यावरण अनुमतीसाठी मप्रनि मंडळ, मुख्यालय, सायन येथे दि. १३/११/२०१९ रोजी अर्ज तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रती दाखल केल्या. सदर अर्जास अनुसरून उप प्रादेशिक कार्यालय, पालघर यांनी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांच्याकडे सदर सुनावणीची तारीख निश्चित करणेबाबत अर्ज दि. १९/१२/२०१९ रोजी दाखल केला. सदर अर्जास अनुसरून मा. जिल्हाधिकारी यांनी सदरची पर्यावरण सुनावणी दि. ११/०२/२०२० रोजी घेण्यात यावी असे कळविले. त्या अनुषंगाने मप्रनि मंडळ, ठाणे यांनी ३० दिवस अगोदर सदर पर्यावरण सुनावणीच्या अनुषंगाने मराठी वृत्तपत्र "दैनिक सकाळ" तसेच इंग्रजी वृत्तपत्र "दैनिक इंडियन एक्सप्रेस" मध्ये दिनांक ०९/०१/२०२० रोजी जाहिरात प्रसिद्ध केली. सदरची जनसुनावणी ही दहीसर तर्फ मनोर, ता. व जि. पालघर या ठिकाणी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल व सदर प्रकल्पाबाबत लोकांचे पर्यावरण विषयक म्हणणे टिका टिप्पणी लेखी स्वरूपात सादर करण्याबाबत आवाहन करण्यात आले. प्रकल्पधारकाने सादर केलेला पर्यावरण विषयक आघात मुल्यांकन अहवाल मुळप्रत व दृकश्राव्य (CD) स्वरूपात खालील शासकिय कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आल्याबाबत कळविले. प्रकल्पधारकाने सादर केलेला पर्यावरण विषयक अहवाल लोकांना अभ्यासण्यासाठी १ महिना अगोदर खालील कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आला.

१. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, जि. पालघर
३. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, ठाणे/उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, , तारापूर -२
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर
५. तहसलिदार, वसई, डहानु, पालघर, तलासरी, जि. पालघर
६. सह संचालक (जप्रनि), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉइंट, तिसरा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड, नं. ८, सायन पुर्व, मुंबई-२२.

   सरपंच, ग्रामपंचयात कार्यालय, -कोशिम्बे, खार्डी, डोलीव, वाधीव सारवली, नवघर, घाटीम, पेनंद, सोनवे, पारगांव, गिराळे, नगाव तर्फ

मनोर, नावझे, साखरे, दहिसर तर्फ मनोर, खामलोली, धुकटन, गोवाडे, मासवन, वांदिवली, वाकडी, वासरोली, काटाळे, लोवरे, निहे, नागझरी, लालोडें, किराट, बोरशेती, रावते, चिंचारे, दाभोण, ऐने, रणकोळ, चांदवड, नवनाथ, गंजाड, सोमनाथ, गणेशबाग, अवढाणी, धानिवरी, चिंचले, तलोठे, पुंजावे, ब्राम्हणवाडी, वंकास, वडावली, सवने, कवाडा, आवरपाडा, तलासरी, ईभाडपाडा.

जनसुनावणीचे आयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२ यांनी मा. अध्यक्षांना पर्यावरण जनसुनावणीचे कामकाज सुरू करण्याबाबत अनुमती मागितली. मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हान्यायदंडाधिकारी यांनी सदर पर्यावरण विषयक जनसुनावणीचे कामकाज सुरू करण्याबाबत सांगितले. त्यांनी सर्वप्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पा विषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर लोकांना त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल. तसेच या समितीचे काम हे पर्यावरण विषयक जनसुनावणी घेणे, लोकांचे टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे या पुरतेच मर्यादित आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर श्री. शिवाजी पवार, उपमहाप्रबंधक, प्रकल्प प्रवर्तक यांचे प्रतिनीधी यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईड शो द्वारे सादरीकरण केले. सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती, ठिकाण इ. बाबतची माहिती दाखविली. सदर प्रस्तावित प्रकल्प हा पालघर जिल्हयातील डहाणु, तलासरी, पालघर, वसई या तालुक्यातून जात असून त्याची पालघर जिल्हयातील लांबी एकूण ७८.३८ किमी इतकी आहे. सदरचा प्रकल्प हा राष्ट्रीय उद्यान तसेच अभयारण्य यामधून जाणार नाही. सध्या अस्थित्वात असलेल्या जुना राष्ट्रीय महामार्ग-८ यावरील वाहतुकीची क्षमता पाहता वडोदरा-मुंबई या ८ पदरी रस्त्याची निर्मीती होणार आहे.

सदर प्रकल्पाची आखणी निश्चित करताना स्थानिक परिस्थितीचा विचार करण्यात आला आहे. सदर प्रकल्प हा तीन भागात विभागला गेलेला आहे. यातील फेज-१ (एकूण २७४.०२ इतक्या किमी लांबीची गुजरात, दादरानगर हवेली,

महाराष्ट्र) या रस्त्यासाठी वने व पर्यावरण मंत्रालय यांचा ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त केलेला आहे. तर फेज-२(अ) मध्ये ७८.११, फेज-२(ब) मध्ये ९४.२९ (स्पर) हा रस्ता महाराष्ट्र राज्यात समावेश आहे. सर्वसाधारणपणे रस्त्याची रुंदी १०० ते १२० मी. इतकी असेल व यामध्ये मोठ्या पुलांची संख्या ८, लहान पुलांची संख्या २९ व मोऱ्यांची संख्या १३३ इतकी असेल. वाहनांसाइी ८ भुयारी, ३ वोहरपास व लहान वाहनांसाठी २१ भुयारी, गायी गुरांसाठी ५१ भुयारी मार्ग केले जातील. एकूण बांधकामांची किंमत रु. ३८५२ कोटी तर एकूण प्रकल्पाची किंमत रु. ७१०१ कोटी इतकी असेल. सदर प्रकल्प क्षेत्रातील जमिनीचा वापर शेती, उद्योग, पडीक जमिन, कांदळवन, जलस्थळ, आरक्षित वन, खाजन जमिन याबाबतची माहिती सादर केली. सदर सादरीकरणामध्ये जमिनीचा वापर, शेती, वने व वृक्षारोपण याबाबतची माहिती तसेच पर्यावरण विषयक माहितीमध्ये हवामानाची स्थिती, हवेची गुणवत्ता, ध्वनीची पातळी, भुजल प्रकार, भुजल गुणवत्ता, भुपृष्ठ जल गुणवत्ता, वनस्पती वृक्षे, प्राणी, पक्षी तसेच जैव विविधता, वन जमिन, सिआरझेड, सामाजिक आर्थिक रुपरेषा याबाबत थोडक्यात माहिती दिली. सदर प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रदूषणाची तिव्रता कमी करण्याच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाययोजना बाबत थोडक्यात माहिती सादर केली.

सदर प्रकल्पामुळे वाहतुकीचा वेळ वाचेल तसेच या परिसरातील औद्योगिक क्षेत्र व वाणिज्य क्षेत्रास चालना मिळेल. सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या घरांचे पुर्नवसन तसेच प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना नियमानुसार योग्य तो मोबदला देय राहील. सदर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या झाडांचे पुर्नवसन तसेच नविन झाडांची लागवड करण्यात येईल. पर्यावरण संरक्षण व विकास यासाठी सदर प्रकल्पामध्ये एकूण 35.05 कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या परिसरातील परिसरातील हवेची गुणवत्ता, पाण्याची गुणवत्ता, जमीनीची गुणवत्ता, वातावरण, खारक्षेत्र, कांदळवन, पशुपक्षी इ. घटकांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच सदर प्रकल्पामुळे या घटकांवर होणारा परिणाम व त्याबाबत करावयाच्या उपाययोजना इ. बाबतचा उहापोह सादरीकरणांमध्ये करण्यात आला. तसेच सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या खडी, रेती ,वाळु, सिमेंट, कामगार

इ. गोष्टीं दरम्यान पर्यावरणाचे कमीतकमी नुकसान होईल याची दक्षता घेण्यात येईल.

सदर प्रकल्पाच्या सादरीकरणानंतर मा. दिलीप गुट्टे, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी / अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी प्रकल्पाच्या अनुषंगाने ज्या लोकांना पर्यावरण विषयक आपली टिका, टिप्पणी, म्हणणे लेखी अथवा तोंडी स्वरूपात या ठिकाणी देऊ अथवा मांडू शकता असे सांगितले. तसेच संबंधित प्रश्नांना प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी त्याबाबत योग्य ते उत्तरे देतील सदर प्रश्नोत्तरांची या ठिकाणी नोंद घेण्यात येईल.

**प्रश्नोत्तरे :**

१. श्री. संतोष पावडे, किराट गाव - यांनी पालघर जिल्ह्यामध्ये सद्य स्थितीत दुतग्रती महामार्ग, रेल्वे स्टेशन, औद्योगिक क्षेत्र अस्थित्वात असताना पुन्हा नविन मार्ग करुन प्रदूषणामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. जर नविन महामार्ग झाला तर या ठिकाणची हरीत झाडे ही नष्ट होतील. या ठिकाणी शेतकरी वर्षाला दुबार पीक घेऊन शेतीतुन दुप्पट उत्पादन घेतात. सदर रस्त्यामुळे त्यांच्या रोजी-रोटीचा प्रश्न निर्माण होईल. सदर प्रकल्पधारक हे फळ देणाऱ्या झाडांची छाटणी केल्या नंतर ते पुन्हा कसे रोपण करणार आहेत. सदरची झाले ही पर्यावरणाच्या दृष्टीने खुप महत्वाची आहेत. त्यामुळे या प्रकल्पास आमचा विरोध आहे व यामुळे या परिसरातील पर्यावरणाची हानी होणार आहे. तरी या प्रकल्पास परवानगी देण्यात येऊ नये.

२. श्री. कमलाकर अधिकारी, नागझरी गाव - गाव प्रकल्पधारकाने जो पर्यावरण विषयक अहवाल धारण केलेला आहे हा पुर्णपणे चुकीचा व खोटा आहे. या अहवालात या परिसरात पाण्याची कमतरता आहे असा उल्लेख केलेला आहे. प्रकल्पधारक हा स्वत: हा परिसर विकास करण्यासाठी

त्याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पास आमचा विरोध आहे.

७. श्री. अशोक पावडे, किराट गाव - सदर प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या लोकांना वा ज्या लोकांची जमिन आहे त्यांना मोबदला मिळणार आहे?

८. श्री. केशव पाटील, रा. खामलोली - प्रकल्प प्रवर्तकाच्या अहवालानुसार आमची जमिन शेती योग्य नाही असे म्हणणे आहे. माझी स्वत:ची १.५ एकर इतकी शेती असुन त्यामध्ये मी वार्षिक १ ते १.५० लाख प्रति एकर इतके उत्पादन घेतो. जर माझी जमिन सदर प्रकल्पात घेतली तर शासन माझे नुकसान कसे भरुन देईल?

९. श्री. गणतप कडु, धानीवरी गाव - सध्या या परिसरात महामार्ग अस्थित्वात असताना पुन्हा दुसऱ्या महामार्गाची का आवश्यकता आहे? जर सदरचा प्रकल्प हा अस्थित्वात असलेल्या महामार्गास लागुन केल्यास नविन अतिरीक्त सुपिक जमिन धारण करण्याची आवश्यकता भासनार नाही.

१०. श्री. क्रिष्णा वैद्, स्थानिक रहिवाशी - माझ्याकडे ५.५ एकर इतकी जमिन असुन मी सदर जमिनीवर शेतीचे उत्पादन घेऊन माझ्या कुटुंबाचा उदार निर्वाह करतो. त्यामुळे सदर जमिन ही शेती योग्य नाही हे म्हणणे चुकिचे आहे. प्रकल्पाधारकाच्या म्हणण्यानुसार वनाचे पुनर्वसन झाडे लावुन करण्यात येईल. पण ज्या शेतीमधून उत्पन्न घेतले जाते त्या जमिनीचे पुनर्वसन कसे करणार?

श्री. शिवाजी पवार, प्रकल्प प्रवर्तक - आपल्या सर्वांचे म्हणणे / तक्रारींची या ठिकाणी मप्रनि मंडळाकडून नोंद घेण्यात येत आहे. मी या

पुर्वीच सांगितल्या प्रमाणे सदर प्रकल्पामुळे काही प्रमाणात पर्यावरणाचे नुकसान होणार आहे पण काही फायदे पण होणार आहेत. जे नुकसान होणार आहे त्याच्यावरती योग्य ती उपाययोजना करून ते भरुन काढण्याचा प्रयत्न केला जाईल. सध्या अस्थित्वात असलेल्या महामार्गामध्ये आणखी सुविधा देणे शक्य नाही त्यामुळे हा नवीन मार्ग तयार करण्यात येत आहे.

११. मा. दिलीप गुट्टे, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी / अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर - सदर महामार्गाच्या खालुन तसेच वरुन काही रस्ते हे जनावरे तसेच वाहतुकीसाठी करणार आहात का याबाबतची माहिती द्यावी.

- **श्री. शिवाजी पवार, प्रकल्प प्रवर्तक ज्या ठिकाणी आवश्यकता असेल तिथे उड्डाणपुल, तसेच रस्त्याखालुन येण्या -जाण्याचा मार्ग, नदी पात्रावर पुल बांधण्यात येतील. गावातील लोकांसाठी, जनावरे तसेच गाड्यांची ये-जा करण्यासाठी रस्त्याखाली योग्य त्या ठिकाणी खालुन जाणारा मार्ग करण्यात येईल.**

१२. श्री. कमलाकर अधिकारी, नागझरी गाव - जर रस्त्याची उंची ही ३.५ मी. इतके असेल व त्याच्या खाली ये-जा करण्यासाठी बांधण्यात आलेल्या रोडवरती पावसाळ्यात पाणी साचल्यास त्या ठिकाणी जनावरे व इतर वाहणे यांची ये-जा कशी होणार?

- **श्री. शिवाजी पवार, प्रकल्प प्रवर्तक - जरी रस्त्याची उंची ३.५ मी. इतके असली तरी रस्त्याखाली ये-जा करण्यासाठी केलेल्या**

**रोडवरती पाणी साठणार नाही तसेच पावसाळ्यात या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होणार नाही याबाबतची दक्षता घेण्यात आलेली आहे.**

१३. श्री.संतोष पावडे, गाव - किराट

- जर सदर प्रकल्पास डहाणु तालुका पर्यावरण संरक्षण समितीची परवाणगी नाही. पर्यावरण अनुमती नाही तर सदरची सुनावणी तसेच जमिन धारण का करण्यात येत आहे?

- **श्री. अमर दुर्गुळे, आयोजक - सदरची सुनावणी ही मा. वने व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रकल्प प्रवर्तकास दिलेल्या अति व शर्तीस अनुसरून घेण्यात येत आहे.**

१४. श्री. अमर दुर्गुळे, आयोजक - सदर प्रकल्प अस्थित्वात आल्या नंतर महामार्गावर ज्या ठिकाणी लोकांना थांबण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे त्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या घन कचऱ्याची तसेच सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावली जाईल?

- **श्री. शिवाजी पवार, प्रकल्प प्रवर्तक - सदर ठिकाणी निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारली जाईल. तसेच घन कचऱ्याची व इतर कचऱ्याची विल्हेवाट ही शास्त्रोक्त पद्धतीने प्रचलित नियमांनुसार करण्यात येईल.**

१५. श्री. मनोहर पाटील, रा. खामलोली - आम्ही या ठिकाणी आमच्या तक्रारी लेखी स्वरुपात दिलेल्या आहेत. तसेच या ठिकाणी स्थानिक पातळीवर मोर्चा सुद्धा काढण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प हा आमच्या जिवनापेक्षा तसेच पर्यावरणापेक्षा महत्वाचा आहे का? या ठिकाणचा हरित

क्षेत्र का खराब करण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे लोकांच्या मनात तिव्र भावना आहेत. लोकांना अश्या प्रकारचा विकास अपेक्षीत नाही.

१६. श्री. डी.बी. पाटील, सदस्य – सदर अहवालामध्ये काही ठिकाणी हवेची गुणवत्ता जसे की PM 2.5 व PM 10 धुळीकणांची गुणवत्ता ही मर्यादेपेक्षा जास्त नमुद करण्यात आलेली आहे त्याबाबत माहिती द्यावी? सदर प्रकल्प उभरल्यानंनातर हवेची गुणवत्ता कशा प्रकारे राहील या बाबत माहिती द्यावी?

- श्री शिवाजी पवार, प्रकल्प प्रवर्तक – सदर हवेची गुणवत्ता ही कोरडे हवामान असताना करण्यात आलेली आहे. त्यामुळे हवेतील धुळीकणांचे प्रमाण हे काही ठिकाणी जास्त आढळून आले तसेच सदर प्रकल्प राबवत असताना व प्रकल्प उभारल्यानंतर वेळोवेळी हवेची गुणवत्ता तपासली जाईल व या बाबत योग्य ती उपाययोजना करण्यात येईल.

-स्थानिक रहिवाशी- सदर हवेची गुणवत्ता तपासण्यात आलेल्या गावांची नवे नमूद करावीत.

-श्री शिवाजी पवार, प्रकल्प प्रवर्तक - सदर हवेची गुणवत्ता ही खर्डी, पारगाव किराट दाभोण आणि ब्राम्हणवाडी या ठिकाणी करण्यात आली आहे.

१७. श्री.मनोहर पाटील, गाव-खांबलोली

– सदर महामार्गावर चालणाऱ्या वाहणांचा वेग हा किती असेल व त्यामुळे निर्माण होणाऱ्या ध्वनी प्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्यावर काय परिणाम होईल? या ठिकाणी ७३% लोक हे शेती या उद्योगावर अवलंबुन आहे. त्यामुळे अश्या महामार्गाचा त्यांच्या जिवनामध्ये काय महत्व आहे व त्याची का गरज आहे? प्रकल्प प्रवर्तकाने या परिसरातील

ध्वनी प्रदूषण, पाण्याची गुणवत्ता या बद्दल योग्य ती माहिती दिलेली नाही. जरी रस्त्याखालील ये-जा करण्यासाठी जागा ठेवली असेल तरी या ठिकाणचे शेतकरी आपली जमिन प्रकल्पास देण्यास इच्छुक नाही.

१८. श्री.प्रमोद कुडू, राहणार खांबलोली – मा. अध्यक्षांनी या क्षेत्रामध्ये कोणकोणते नविन प्रकल्प प्रस्तावित आहेत या बद्दल माहिती द्यावी. जेणेकरुन या परिसरातील लोकांची मानसिकता सदर प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणामास सामोरे जाण्यास तयार होईल.

मा. दिलीप गुट्टे, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी / अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर – सदर सुनावणीच्या अनुषंगाने आनखी कोणास आपली मते लेखी स्वरुपास द्यावयाची असल्यास या ठिकाणी ती स्विकारण्यात येतील. तसेच ई-मेलव्दारे मप्रनि मंडळास आपण कळवावित.

शेवटी जन सुनावणी समितीचे अध्यक्ष मा. श्री दिलीप गुट्टे, अप्पर जिल्हाधिकारी / अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे, आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, सी.डी. व आपली निवेदने ही पुढे वने व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे पाठविले जाईल असे सांगितले. तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचेआभार मानले व त्यांनी जनसुनावणी यशस्वी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(अमर दुर्गुळे)**<br>उप प्रादेशिक अधिकारी<br>म.प्र.नि. मंडळ, तारापुर-२<br>आयोजक/सदस्य जनसुनावणी समिती,मप्रनि मंडळ | **(श्री. डी.बी. पाटील)**<br>प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, ठाणे<br>प्रतिनिधी, सदस्य सचिव | **(श्री. दिलीप गुट्टे)**<br>अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी /अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर |